# ४०. काळजी

मित्रांनो आज मी तुम्हाला एका काळजीची गोष्ट सांगणार आहे. डिसेंबर महिना असेल. कधी नव्हे ती मुंबईत थोडीफार थंडी पडत होती.

नेहमीप्रमाणे सकाळी मी फिरायला बाहेर पडलो. आमच्या सोसायटीची शाळा आहे. प्रवेशदाराजवळ गर्दी दिसली. शाळेची सहल आहे हे समजायला फारसा वेळ लागला नाही. त्या गर्दीतून वाट काढत मी सटकलो. तासभर फिरून आलो तेव्हा गर्दी तशीच होती.

आता सर्व मुले वर्गात बसली होती व त्यांचे पालक शाळेच्या गेटपासून दूतर्फा उभे होते. रस्त्यावर ६ बस उभ्या होत्या. एका बसमध्ये मुले बसली होती. त्या बसला तर पालकांनी गराडाच घातला होता. काही पालक तर जवळ जवळ बसला लटकतच होते व पाल्याला सुचना देणे चालू होते. बॅग कोठे ठेवली आहेस ? पाण्याची बाटली हातात आहे ना ? टोपी जवळच ठेव. खिडकीबाहेर हात काढू नकोस. बिचारी मुले सुचना ऐकू कि मित्राशी बोलू अशा व्दिधा मनःस्थितीत होती.

ज्या मुलांचे पालक घरी गेले होते ती सुखात होती व सुचनांची मजा अनुभवत होती. एकेका वर्गातील मुले ओळीने बाहेर येऊन एकेका बसमध्ये बसत होती. आतापर्यंत शांतपणे उभे असलेले पालक परत आपल्या मुलांकडे झेपावत होते व ते व्यवस्थित बसमध्ये चढले का नाही हे बघण्याचा प्रयत्न करत होते. २०० मुले व त्यांचे २०० पालक यांची कसरत चालू होती. जायला इतर लोकांना रस्ता आहे की नाही त्याचेही भान नव्हते.

मला हे सर्व बघून मजा आली. मी एका ओळखीच्या पालकाला म्हटले कि अरे तु अजुन उभा का ? तर मला म्हणाला की अरे विजय अजून वर्गात आहे. त्यांचा वर्ग अजुन बसमध्ये बसला नाही. मी म्हणालो की मग काय ? वर्गशिक्षकांच्या ताब्यात दिलास ना ? पण तो म्हणाला कि एकदा विजय बसमध्ये बसला असे सौला सांगितले कि तीचा जीव भांडयात पडेल.

किती ही काळजी ? पालक काळजी करणे आणि काळजी घेणे ह्या दोन गोष्टींची गल्लत करत होते. पालकांनी काळजी तर घेतली होती. पण तिथेच न थांबता ते आता काळजी करायला लागले होते. मुलाला वेळेवर तयार करून शाळेत सोडणे, खायला आवडीचे पदार्थ देणे, पाण्याची बाटली, टोपी, गोळया, खेळाचे साहित्य असे सर्व काही दिले होते. थोडेसे पैसेही मजा करायला दिले होते. मुलाला शाळा व्यवस्थापनाच्या ताब्यात दिले होते. सहलीसाठी बसेसपण वेळेवर आल्या होत्या. ‘ काळजी घेणे ’ ह्याची ही हद्द.

त्यानंतर त्यांचे शाळेच्या आवारात थांबणे , बसमध्ये बसला का नाही , बसल्यानंतर सुचना देत राहणे ही काळजी करत बसणे ह्या हद्दीत येते. मला खात्री आहे कि पुष्कळसे पालक बस सुटेपर्यंतसुद्धा थांबले असतील.

मित्रांनो तुम्हाला काय वाटते ? हे जरा अतीच होते आहे नाही ? घरी सुचना केल्या असतीलच मग मुलाला परत परत तेच ते सांगण्यात काय अर्थ आहे ?

मुलगा सहलीला जाणार म्हणून खुश असतो. आज आपणहून लवकर उठलेला असतो. त्याला जरा मोकळेपणा मिळू दे. ह्या वागण्याने त्याचा आत्मविश्वास डळमळीत व्हायला आपण खतपाणी घालत असतो.

आमच्या लहानपणी तर ६0 मुलांच्यात २ ते ३ च पालक शाळेत सोडायला आलेले असायचे. नेहमीप्रमाणेच मुले शाळेत येत. ह्याचा अर्थ काय ? पूर्वीच्या काळी पालकांना आपल्या मुलांची काळजी नव्हती ? अर्थात एक कारण होते कि घरात २ ते ३ भावंडे. वडिलांची सामान्य परिस्थिती. मुलांकडे बघायला एवढा वेळा होता कोणाकडे ? तसेच जीवन ही एक शाळा आहे व प्रत्येकाने त्यात शिकत राहिले पाहिजे अशी वडिलधा-यांची मानसिकता पण होती.

पण हल्लींचा काळ वेगळा आहे. आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. एकूलता एक मुलगा नाहितर मुलगी. त्यामुळे त्यांची किती काळजी घेऊ ? अशी पालकांची मनःस्थिती असते. कारण मुलांना न देता येण्याच्या वेळेची किंमत दुस-या रितीने देण्याचा तो एक केविलपणा प्रयत्न असतो.

वडिलांनी आम्हा भावंडांसाठी जो वेळ दिला त्याचे महत्व आयुष्याच्या संध्याकाळी जास्तच समजते.
मी घरी आलो. माझा फारसा मुड नाही असे वाटल्यामुळे सौ नी विचारले की काय आज जास्त दमलास का ? मी तीला थोडक्यात वरील सर्व किस्सा सांगितला. पण तीचे समाधान झाले नाही. मग माझ्या मनातील हळवा कोपरा मी उघडला.

आज मुलांना ज्या सहजपणे सहलीसाठी परवानगी मिळते तसा प्रकार मी अनुभवला नव्हता. पाचवीत असताना आमच्या शाळेची सहल घारापुरीला गेली होती . ( १९६२ ) २ रू. वर्गणी होती. ३ दिवसांनी परवानगी मिळाली होती. ६ वीत महाबळेश्वरला ३ दिवसांची सहल होती. वर्गणी रू. २0/- ( १९६३ ) मी दादांना सांगितले की मला सहलीला पाठवा. मी एसएससी होईपर्यंत कधीही सहलीला जाणार नाही. मी माझा शब्द पाळला. असो.

काय मित्रांनो गंभीर झालात ? तुमचा काय अनुभव ?